**MHSO010030232020**

**सोलापूर येथील तदर्थ जिल्हा न्यायाधीश – २ यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी – श्री. ओमशंकर शिवराज पाटील)

**भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ६६/२०२०**
(उवविभागीय अधिकारी, पंढरपूर वि. दत्तात्रय ढेकळे व इतर)

---

**निशाणी ०४ खालील आदेश**

अर्जाचे, लेखी म्हणण्याचे आणि संचिकेचे अवलोकन केले. विद्वान विधिज्ञ श्री. चिवरी यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार गैरहजर. विद्वान विधिज्ञ श्री. चिवरी यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदाराची नावे निवाडयात किंवा ७/१२ उताऱ्यात नमुद नाहीत. अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदाराने काहीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. परंतु मी या युक्तीवादाशी सहमत नाही. कारण प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे नियमित दिवाणी दावा क्र. ४०२/२०२० या दाव्यातदेखील पक्षकार आहेत. त्यामुळे अर्जातील कथनांचा विचार करता अर्जदारांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे मला न्यायोचित वाटते. त्यामुळे उभय पक्षकारातील वादाचे निराकरण करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या प्रकरणाचा निकाल गुणवत्तेवर करण्यासाठी अर्ज मंजुर करण्यात येतो. खर्चाबाबत आदेश नाही. सरकारने लवकरात लवकर प्रस्तुत अर्जदारांना या प्रकरणात समाविष्ट करावे आणि त्याप्रमाणे दुरुस्ती करावी.

PATIL OMSHANKAR SHIVRAJ

Digitally signed by PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Date: 2026.07.13 16:22:21 +0530

**(ओमशंकर शिवराज पाटील)**

दिनांक – १३/०७/२०२६

तदर्थ जिल्हा न्यायाधीश – २, सोलापूर.